बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १८ सप्टेंबर २०२५**

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४७५/२०२५ भा.न्याय संहिता कलम ३१६(२),३१८(४),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०७/०४/२०२५ रोजी ते आजतागायत पर्यंत, सिध्देश्वर पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०९/२०२५ रोजी १४.०५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मोहम्मद शोएब म.इसाक शेख, वय- ४० वर्षे, रा. १२७, दारुल सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) राजु शहा, रा. अहमदाबाद, गुजरात, २) मोरीवाला याकुबभाई, रा. डगरपुर, राजस्थान, ३) रहिमभाई गफुरभाई भायला, रा. मोडसा, गुजरात |
| **फसवणुक र.** | : | ५,००,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे युनायटेड स्टील केंद्र सिध्देश्वर पेठ, सोलापूर येथे यातील नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, बांधकामाचे स्टीलचा माल घेवून देतो असे म्हणून सदर व्यवहाराकरीता ५ लाख रुपये घेवून स्टीलचा माल न देता व फिर्यादीने दिलेले पैसे परत न करता, फिर्यादीचा विश्वासघात करुन आर्थिक फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- सपोनि- चानकोटी- **९३५९१२२११२** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४७७/२०२५ भा.न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०९/२०२५ रोजी २०.०० वा ते दि. १४/०९/२०२५ रोजी सकाळी ०६.०० वा चे दरम्यान, रविवार पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०९/२०२५ रोजी २०.०० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | लक्ष्मीकांत अंबाजी आडकी, वय- ४९ वर्षे, रा. १२८, राजेंद्र चौक, रविवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ४५,०००/- रु एक काळे निळा रंगाची हिरो एच एफ डिलक्स मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी ए ७५९७ ही फिर्यादीचे घरासमोर हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुददाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- सफौ- नदाफ- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७७६/२०२५ भा.न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १६/०९/२०२५ रोजी १९.३० वा ते दि. १७/०९/२०२५ रोजी १०.३० वा चे दरम्यान, अक्कलकोट रोड, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १७/०९/२०२५ रोजी २१.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | शुभम बसवराज बमगोंडे, वय- ३० वर्षे, रा. ३१/ब, महालक्ष्मी सोसायटी, शेळगी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | ५०,०००/- रु त्यात ४ टायर मॅकविलसह, १ टायर रिमसह |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी काम करीत असलेल्या चव्हाण मोटार कंपनीतील पार्कींगमध्ये असलेले नमुद वर्णनाचे व किंमतीचे टायर कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेले आहेत म्हणून. तपास:- पोहेकॉ/ २७३ गायकवाड- ७६५०२७३२७३ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ७७७/२०२५ भा.न्याय संहिता कलम ११८(१),११५(२),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. १६/०९/२०२५ रोजी २१.१५ वा चे सुमारास, न्यु मल्लिकार्जुन नगर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १७/०९/२०२५ रोजी २३.२४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | गैरप्पा महादेव गाडेकर, वय- ४३ वर्षे, रा. न्यु मल्लिकार्जुन नगर, २१२, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) बिरप्पा बन्ने, २) राकेश गंजी, ३) व्यंकटेश पलमारी, सर्व रा. न्यु मल्लिकार्जुन नगर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील महेश्वरी माता मंदिर समोर, सोलापूर येथुन आरोपीत क्रं. १ याने मागील भांडणाचा राग मनात घरुन पत्र्याच्या घरावर दगड टाकत असताना त्याला विचारल्यावर त्याने त्याचे हातातील कडयाने फिर्यादीचे डोकीस मारुन जखमी करुन मुलगा परशुराम व पत्नी सोडवण्यास आले असता आरोपीत क्रं. १,२,३ यांनी फिर्यादी व मुलाला हाताने, लाथाबुक्यानी माराहण करुन जखमी केले व शिवीगाळ दमदाटी केली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ७४५ डोके- ९८२३८१३०३१ |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४३९/२०२५ भा.न्याय संहिता कलम ११८(१) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०७/०९/२०२५ रोजी १९.०० व चे सुमारास, कुमार नगर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १७/०९/२०२५ रोजी १४.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | नागेश्वर शिवाजी इरकशेट्टी, वय- ४४ वर्षे, रा. १४ कुमार नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | गणेश चंद्रकांत कांबळे, रा. कुमार नगर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील नमुद ठिकाणी रेल्वे बोगदयाजवळ फिर्यादी रिक्षा घेवून जात असताना, यातील आरोपीत मजकुर हा फिर्यादीस थांबवुन मागील भांडणाचा राग मनात धरुन त्याचे हातातील लाकडी बांबुने फिर्यादीचे दोन्ही हाताला व सर्वांगास मारहाण करुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३२५ सांगळे- ८८८८९०१९९९ |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४०/२०२५ भा.न्याय संहिता कलम ३०४(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०९/२०२५ रोजी ०५.३० वा चे सुमारास, हॉटेल रसोई घर ते पुष्पक ईडली गृह दरम्यान, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०९/२०२५ रोजी १४.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रेमलता सिदराया होर्तीकर, वय- ७१ वर्षे, रा. ६ अ, अध्यापक नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दोन अनोळखी इसम |
| **गेला माल** | : | ४०,०००/- रु ८ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसुत्र |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या हनुमान मंदिरात दर्शन करुन परत घराकडे जात असताना, नमुद ठिकाणी आल्या असता, दोन अज्ञात इसमांनी मोटार सायकल वरुन फिर्यादीसमोर येवून फिर्यादीचे गळयातील नमुद वर्णनाचा व किंमतीचे मंगळसुत्र हिसकावुन, जबरदस्तीने काढुन घेवून गेले आहे म्हणून. तपास:- पोहकॉ/ १३१७ परदेशी- |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४१/२०२५ भादवि ४९८(अ),३२३,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३०/११/२०२१ ते दि. १९/१०/२०२२ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी, |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०९/२०२५ रोजी १९.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | स्नेहल निलेश माने, वय- ३० वर्षे, रा. ६८ वजीर नगर, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) निलेश माने- पती, रा. धाराशिव, २) ज्योती- सासु, ३) दिलीप सासरे, ४) कल्पना बोडके- पतीची मावशी, रा. कोल्हापुर, ५ सागर माने- दिर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी सासरी असताना यातील नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीस तु मला पसंत नाही, तु तुझ्या माहेरी निघुन जा असे म्हणून सारखे त्रास देत होते. तसेच हिला तु सोडुन दे, तु दुसरे लग्न कर असे म्हणुन, तसेच तुला जर यापुढे आमच्या कडे नांदायचे असेल तर तुझ्या माहेरुन २ लाख रुपये घेवून ये व आमचे बद्दल माहेरी सांगितली तर बघ असे म्हणून धमकी देवून, फिर्यादीस मानसिक व शारीरीक व आर्थिक छळ केला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११८७ फुलारी- |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४२/२०२५ भा.न्याय संहिता कलम ८५,११५(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/०६/२०२४ रोजी ते दि. ३१/१२/२०२४ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०९/२०२५ रोजी २०.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रेरणा अजित व्हटकर, वय- २३ वर्षे, रा. सध्या- ११/२, कृष्णा अपार्टमेंट रुम नं. १३६, आसरा चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अजित- पती, २) मंगल- सासु, ३) संजय- सासरे, सर्व रा. ८२७, रिध्दी सिध्दी गार्डन, लवळे मुळशी, पुणे |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीस वेळोवळी घालुन पाडुन बोलुन आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस चापट मारली तसेच त्याचे कोमल हिचेसोबत अफेअर आहे, तिचेसोबत लग्न करणेसाठी सासु, सासरे यांनी परवानगी दिली आहे असे म्हणाले व तिला नेहमी मेसेजेस करत असुन फिर्यादीस डिवोर्स देण्याची तयारी आहे असे सांगितले असता, आरोपीत क्रं. २ व ३ यांनी आपण मिळवु असे म्हणाले होते परंतु ते आरोपीत क्रं. १ याचे बाजुने आहेत, अशा प्रकारे फिर्यादीस मानसिक त्रास देत असुन फिर्यादीस नांदायचे आहे परंतु तिला भविष्यात व्यवस्थित नांदवतिल याची शाश्वती नाही म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११९५ बहिर्जे- ८३७८९८०९८७ |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७५६/२०२५ भा.न्याय संहिता कलम ११५(२),३५२,३५१(२),१८९(२),१९१(२), १९१(३),१९०, आर्म ॲक्ट ४,२५, मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १५/०९/२०२५ रोजी २०.३० वा चे सुमारास, कुर्बान हुसेन नगर येथील डेक्कन मोटार समोर असलेल्या दारुल कजा संस्थेच्या बाहेर असलेल्या कटयावर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०९/२०२५ रोजी २०.२७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आसीफ अब्दुलरजाका दंडु, वय- ३५ वर्षे, रा. घर नं. २३०/३ ब, गोदुताई विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अजहर शेख, ऊर्फ गोल्डन, २) तोहिद विजापूर ऊर्फ पैलवान, ३) रेहान शेख, ४) अजगरअली कुरेशी, ५) अजगरअली कुरेशी याचा भाऊ नाव माहित नाही, ६) अजहर शेख ऊर्फ गोल्डन याचे दोन भाचे नाव माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचे मित्र असे सर्वजण बसले असताना, २०.०० वा चे सुमारास कुमठा नाका येथे आरोपीत क्रं. १ यास पैसे का मागितला या कारुणावरुन वरील आरोपीत क्रं. १ ते ६ यांनी सर्वजण हातात तलवार, हॉकी स्टिक, लोखंडी रॉड आणि काठी घेवून येवून आरोपीत क्रं. १ याने हवेत तलवार फिरवुन तु मुझे पैसे मांगता क्या, असे म्हणून शिवीगाळ करुन दहशत निर्माण केली. सदरवेळी तो तलवार फिरवत असताना साहिल शेख यास उजव्या हाताच्या दोन बोंटांमध्ये तलवार लागले. तसेच फिर्यादी तेथुन पळुन जात असताना फिर्यादीस वरील आरोपीतांनी खाली पाडुन लाथाबुकयाने मारहाण केल्याने फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. तपास:- पोहेकॉ/ १२७७ काळे- ९७६४९७६३६२ |